सायं.दैनिक बीड **किसान**

www.beedkisan.in

• संपादक : शेख कामरान • BEED KISAN

# शिक्षकांच्या वेतनासाठी जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन यांचे शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन



**बीड । किसान न्युज**

बीड जिल्ह्यातील अल्पसंख्याक व बिगर अल्पसंख्याक संस्थांमधील प्राथमिक शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सप्टेंबर महिन्याचे वेतन देयक ऑनलाइन प्रणालीतील तांत्रिक अडचणीमुळे रखडले आहे. शासकीय प्रणालीवर शिक्षणाधिकाऱ्यांच्या लॉगिनला उपलब्ध असलेला वेतन देयक मंजुरीचा ऑनलाइन 'टॅब' बंद पडल्यामुळे ही बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना (शिंदे गट) अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन (ए.एस. गोलू) यांनी आज ७ ऑक्टोबर रोजी माननीय शिक्षणाधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड) यांना लेखी निवेदन » पान २ वर

बीड ▪ वर्ष ६ ▪ अंक १५२ ▪ गुरुवार, दि. ०८ ऑक्टोबर, २०२६ ▪ पोस्टल दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२६ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.

BEED ▪ Year-6 ▪ Issue-152 ▪ Thursday 08 October, 2026 ▪ Postal Date 09 October, 2026 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

# थेरपीच्या नावाने लायकी नसलेल्या लोकांनी धंदा मांडला; कोणती डीग्री नाही अनुभव नाही मुंडे साहेब एकदा तुमच्या लोकांना सांगून लक्ष घाला!

## जेवढे थेरपीचे दवाखाने उघडले ते एकदा बघा किती नियमात आहेत; कोणाच्या नावावर कोणी पण चालवतोय!



**बीड । किसान न्युज**

**बीड शहरासह जिल्ह्यातील इतरही ठिकाणी फिजिओथेरपीच्या नावाखाली निव्वळ बोगसगिरी सुरू आहे. तसेच कोणत्याही रुग्णाला स्वत:च्या जवळचे हजारो रुपयांचे मेडिसीन रुग्णांच्या माथी मारुन त्यांचा खिसा रिकामा आणि स्वत:चा गल्लाभरो अशी निव्वळ एककलमी कार्यक्रम या लोकांकडून होताना दिसत आहे. यामुळे अन्न व औषध प्रशासनाने या फिजिओथेरपी सेंटर कडे लक्ष देवून बीड जिल्ह्यातील या सेंटरची एकदा तुकाराम मुंढे यांनी झडती घ्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

वैद्यकीय व्यवसाय करण्याचा परवाना नसताना अनेक बोगस डॉक्टर ग्रामीण आणि शहरी भागात वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत. अशा 'निम हाकिम खतरे मे जान' डॉकरांच्या विरोधात शासनाने कायदा केला आहे. या आधारे लोपॅथी प्रॅक्टिस करणाऱ्यांवर आरोग्य विभाग पोलिसांच्या मदतीने कारवाई करतात. यातून पळवाट काढत बऱ्याच ठिकाणी फिजिओथेरपी उपचार केंद्र सुरू केल्याचे दिसून येत आहे. यावर कोणी लक्षही देत नाही. यामुळे अशा लोकांची दुकानदारी जोरात सुरू आहे. हे लोकं मोठं मोठे दावे करीत रुग्णांची फसवणूक करीत असल्याची चर्चा आहे. यांच्याकडे कोणी रुग्ण गेला की, त्याला मोठ्या प्रमाणात स्वत:च्या जवळील विविध कंपन्यांचे मेडीसीन (औषधे ) देऊन त्यांची लूट करण्यात येते असे ही काहींनी सांगितले आहे. तसेच दुसरा प्रश्न हे आहे की, फिजिओथेरपी उपचार करण्यासाठी यांच्याकडे परवाना आहे का? त्यांनी याची कोणती डिग्री घेतली आहे की, डिप्लोमा केला आहे. हा व्यवसाय करण्यासाठी यांना अधिकृत परवानगी आहे का? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यांची दुकानदारी मात्र राजरोसपणे सुरू आहे. केवळ गल्लाभरो मोहीम सुरू करण्यात आली आहे. यामुळे यांच्याकडे आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासन लक्ष देणार का? यांच्या केंद्रात छापे टाकून झडती घेत यांच्या कागदपत्रांची तपासणी करणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. रुग्णांच्या आर्थिक आणि आरोग्याच्या दृष्टीने निर्णय घेऊन आरोग्य विभागाने अशा लोकांवर कारवाई करावी अशी मागणी जोर धरु लागली आहे.

### अनेकांकडे परवानेच नाही तर काहींचे दुसऱ्याच्या नावाने

जिल्ह्यात व शहरात सुरू असलेल्या अनेक फिजिओथेरपी सेंटर चालकांअडे परवानेच नाहीत. काही जणांकडे दुसऱ्याच्या नावाचे परवाने आहेत. परवाना वेगळ्याच माणसाचा अन् चालविणारा तिसराच असे चित्र आहे. यामुळे या फिजिओथेरपीचा रुग्णांना काही फायदा होताना दिसत नसून केवळ या सेंटर चालकांची दिवाळी सुरू दिसून येत आहे. यामुळे यावर कुठेतरी रोखावे लागणार असल्याची चर्चा सुरू आहे.

# नटसम्राट हरवला



**संपादक । कामरान शेख**

**काही माणसं जात नाहीत ती आपल्या आठवणींमध्ये, आपल्या शब्दांमध्ये आणि आपल्या संवेदनांमध्ये कायमची जिवंत राहतात. नाना पाटेकर हे त्यापैकीच एक! मराठी माणसाच्या मनाला आज एक मोठा धक्का बसला आहे. रंगभूमीवर संवाद फेकताना अंगावर काटा आणणारा आवाज, पडद्यावर अन्यायाविरुद्ध उभा ठाकलेला चेहरा आणि कॅमेऱ्याच्या बाहेर शेतकऱ्यांच्या अश्रूंमध्ये स्वत:चे दु:ख शोधणारा संवेदनशील माणूस ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आज आपल्यातून निघून गेले.**

७५ वर्षांचा हा प्रवास म्हणजे केवळ एका अभिनेत्याची कारकीर्द नव्हती; तो संघर्षाचा, जिद्दीचा, संवेदनशीलतेचा आणि माणुसकीचा प्रवास होता. विश्वनाथ पाटेकर नावाचा हा मुलगा पुढे संपूर्ण देशाला 'नाना पाटेकर' म्हणून परिचित झाला. गमनपासून सुरू झालेला अभिनयाचा प्रवास परिंदा, अंगार, तिरंगा, क्रांतिवीर, अग्निसाक्षी, अब तक छप्पन, अपहरण, राजनीती अशा असंख्य भूमिकांमधून पुढे गेला. त्यांच्या आवाजात एक वेगळीच ताकद होती. संवाद त्यांच्या तोंडून बाहेर पडला की तो केवळ संवाद राहत नसे; तो प्रेक्षकाच्या मनात घुसणारा अनुभव बनत असे. तीन राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांच्या अभिनयाची साक्ष देतात. २०१३ मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्रीने सन्मानित केले. पण पुरस्कारांची यादी कितीही मोठी केली, तरी नानांच्या कलेची उंची त्या यादीत मावणार नाही. 'नटसम्राट'मध्ये गणपतराव बेलवलकर साकारताना नानांनी केवळ एका वृद्ध रंगकर्मीची भूमिका केली नाही; त्यांनी आयुष्याच्या उत्तरार्धातील एकाकीपणा, माणसांची बदलती नाती, कुटुंबाची ओढ, कलाकाराचा अहंकार आणि शेवटी माणूस म्हणून उरलेली असहाय्यता पडद्यावर जिवंत केली. गणपतराव बेलवलकर प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आणून गेला. पण कदाचित काळालाही ठाऊक नव्हते की, एक दिवस पडद्यावरचा तो 'नटसम्राट' खऱ्या आयुष्यातही आपल्या आठवणींच्या रंगमंचावर कायमचा उभा राहील. नानांनी स्वत:ही 'नटसम्राट'च्या भूमिकेच्या मानसिक आणि शारीरिक तीव्रतेबद्दल बोलताना तिचे गांभीर्य व्यक्त केले होते. आज पडदा खाली आला आहे. पण टाळ्यांचा आवाज अजूनही कानात घुमतो आहे. नाना पाटेकर यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा अध्याय कदाचित त्यांच्या चित्रपटांनंतर सुरू झाला. महाराष्ट्रातील दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कर्जबाजारीपणा, पाण्याची समस्या आणि उद्ध्वस्त झालेली कुटुंब पाहून नानांच्या मनातला कलाकार अस्वस्थ झाला. आणि त्यातून जन्म झाला 'नाम फाउंडेशन'चा, मकरंद अनासपुरे यांच्या सोबतीने २०१५ मध्ये सुरू झालेल्या नाम फाउंडेशनने शेतकरी, पाणी संवर्धन, गावांचा विकास आणि दुष्काळग्रस्त भागांसाठी काम उभे केले. नानांनी अनेकदा सांगितले की, चित्रपटातून मिळालेला पैसा, पुरस्कार आणि प्रसिद्धी यापेक्षा एखाद्या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आलेले समाधान त्यांना अधिक मोठे वाटते. हे वाक्य त्यांच्या संपूर्ण आयुष्याचा आरसा आहे. बीडच्या मातीलाही नानांनी अस्वस्थ केले. मराठवाड्यातील शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबांची अवस्था नानांनी जवळून पाहिली होती. बीडसारख्या जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांनंतर उरलेल्या तरुण विधवा, त्यांची लेकरं आणि उद्ध्वस्त झालेली घरं पाहून नानांच्या मनावर खोल परिणाम झाला होता. २०२६ मध्येही त्यांनी बीडच्या » पान २ वर

## कामावर गेलेली व्यक्ती घरी परतलीच नाही

### पोलिसांकडून माहिती देण्याचे आवाहन

**बीड । किसान न्युज**



शहरातील तेलगाव नाका परिसरातील ४२ वर्षीय व्यक्त नेहमीप्रमाणे स्लॅब भरण्यासाठी मशीनवर कामाला गेले होते. मात्र ते रात्री ९ वाजले तरी घरी न पोहोचल्याने तसेच चौकशी करुनही मिळून न आल्याने बीड शहर पोलीस ठाण्यात मुलाच्या खबरेवरुन मिसिंग दाखल करण्यात आली असून, यांचा शोध घेण्यासाठी मदत करुन काही माहिती असल्यास पोलिसांना कळवावे असे आवाहन बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांनी केले आहे. शेख जाफर » पान २ वर

# दुष्काळात होरपळणाऱ्यांना दिलासा द्या : योगेश क्षीरसागर



**बीड । किसान न्युज**

दि.८ : बीड विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी परिस्थितीची तीव्रता लक्षात घेऊन नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी भाजपच्यावतीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे बुधवारी (दि.७) करण्यात आली. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात पुढे म्हटले की, शहरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासह ग्रामीण भागातील नागरिक आणि पशुधनासाठी पाणी व चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करावी. शहरातील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा व्हावा, यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी. कॅनॉल रोड ते पाली धरण नवीन पाइपलाइनचा प्रस्ताव मार्गी लावावा, पाणीगळती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात तसेच अनधिकृत नळजोडण्यांवर कारवाई करावी. याशिवाय » पान २ वर

### आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

# अंबाजोगाईत १०० प्रवेश क्षमतेचे 'बी.एस्सी. नर्सिंग' महाविद्यालय होणार

**अंबाजोगाई । किसान न्युज**



राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने अंबाजोगाई येथील शासकीय जी.एन.एम. पदविका नर्सिंग महाविद्यालयाचा दर्जा वाढवून तेथे नवीन 'बी.एस्सी. नर्सिंग' महाविद्यालय सुरू करण्यास महत्त्वपूर्ण मान्यता दिली आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या मंजुरीसाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता, ज्याला आता मोठे यश मिळाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय शिक्षण विभागाने परिचारिकांची संख्या वाढवण्याच्या उद्देशाने हा राज्यव्यापी निर्णय घेतला आहे. नव्या मान्यतेनुसार अंबाजोगाईच्या या महाविद्यालयात आता दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना बी.एस्सी. नर्सिंगचे उच्च शिक्षण घेता येणार आहे. ग्रामीण आणि दुर्गम भागातील रुग्णालयांना पुरेशा प्रशिक्षित परिचारिका मिळाव्यात, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. या महाविद्यालयासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून भरीव निधी उपलब्ध होणार असून लवकरच आवश्यक पदे भरण्याची प्रक्रियाही सुरू केली जाईल. शासनाच्या या निर्णयामुळे बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील ग्रामीण आरोग्यसेवा अधिक मजबूत होणार आहे. तसेच, वैद्यकीय क्षेत्रात स्वत:चे करिअर घडवू पाहणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांसाठी ही एक मोठी सुवर्णसंधी ठरणार आहे.

# शिवछत्रच्या आशीर्वादाने सतीश चव्हाण विजयाचा चौकार मारणार!

## मागील महिनाभरापासून सुरु केलेल्या गाठीभेटीने

## मराठवाड्यात घड्याळाची टिकटिक एक नंबर



### पंडित बंधू प्रमाणे अनेकांचे बळ पाठीशी

आ. सतीश चव्हाण यांनी महत्त्वाची असते अशी पदवीधर मतदार नोंदणीतही मोठी आघाडी घेतली आहे. ही मोठी उपलब्धी त्यांचा विजय सोपा करणार आहे. तसेच जसे बीडमध्ये पंडित बंधूंचे बळ पाठिशी आहे असेच अनेकजण आ. चव्हाण यांच्या पाठीशी उभे असल्याने ही त्यांची जमेची बाजू असल्याने त्यांचा विजय हा निश्चित असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे.

**बीड । किसान न्युज**

**आ. सतीश चव्हाण यांना मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची चौथ्या टर्म साठी उमेदवारी घोषित झाली असून, त्यांनी महिनाभरापासून सुरू केलेल्या गाठीभेटी आणि शिवछत्रच्या आशीर्वादाने सतीश चव्हाण विजयाचा चौकार मारणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. सध्या तरी मराठवाड्यात महायुतीच्या घड्याळाची टिकटिक नंबर एकच्या पसंतीवर असल्याची चर्चा सुरू झाली आहे.**

मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची सध्या रणधुमाळी सुरू आहे. तसे रणधुमाळी म्हणता येणार कारण विरोधक सध्या कुठेही दिसत नाहीत. तसेच मागील सलग तीन टर्म आणि १८ वर्षांपासून आ. सतीश चव्हाण नेतृत्व करीत असल्याने त्यांना मतदारसंघाची खडानखडा माहिती आहे. तसेच त्यांच्याकडे पंडित बंधु सारखे अनेक मित्र असून या बळावर त्यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. तसेच महायुतीचे अधिकृत उमेदवारी घोषित होण्यापासून ते प्रचाराचा नारळ फोडणे आणि प्रत्यक्ष प्रचाराचा धुरळा उडविण्यात त्यांनी आघाडी घेतली आहे. तसेच पदवीधर मतदार नोंदणीत ही आ. सतीश चव्हाण यांची यंत्रणा आघाडीवर आहे. तसेच त्यांनी मागील महिनाभरापासून अख्या मराठवाड्यात संपर्क दौरे करीत अनेक संस्था चालक, शिक्षक, प्राध्यापक आणि पदवीधर मतदारांच्या प्रत्यक्ष भेट घेण्यावर भर दिला आहे. तसेच आज ते बीडच्या दौऱ्यावर असून शहरातील अनेक शाळा, कॉलेजला भेटी देत पदवीधर मतदारांशी संवाद साधला आहे. या त्यांच्या दौऱ्याला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे आ. सतीश चव्हाण मोठा मतदारसंघ असला तरी प्रत्येक » पान २ वर

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स

पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड

9850643058

सोने २४ कॅरेट 149,000

२२ कॅरेट 140,000

चांदी प्रतिकिलो 220,000

# तेंव्हाच दखल घेतली असती तर आज दुष्काळात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना आधार मिळाला असता

## ज्योती मेटेंचा इशारा ठरला खरा; पीक विम्याचे ट्रिगर रद्द केल्याने शेतकरी अडचणीत

**बीड । किसान न्युज**



दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांना तातडीची विमा भरपाई मिळण्यासाठी महत्त्वाची ठरणारी पीक विमा योजनेतील तीन ट्रिगर २०२५ पासून रद्द करण्याचा निर्णय आता चांगलाच अडचणीचा ठरत असल्याचे चित्र आहे. याच निर्णयामुळे भविष्यात शेतकऱ्यांचे नुकसान होईल, असा इशारा शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी यापूर्वीच शासनाला दिला होता. दरम्यान, दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी झालेल्या महाराष्ट्र शासनाच्या दुष्काळ निवारण उपसमितीच्या बैठकीत याच विषयावर गंभीर चर्चा झाल्याचे समोर आल्याने डॉ. मेटे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला आता पुन्हा उजाळा मिळाला आहे. सुधारित पीक विमा योजनेत हंगामातील नुकसान अथवा दुष्काळाच्या परिस्थितीत लागू होणारे ट्रिगर यापूर्वी महत्त्वाचे ठरत होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानंतर पात्र शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम नुकसानभरपाई देण्याची तरतूद होती. मात्र, २०२५ पासून हे ट्रिगर रद्द करून पीक विमा भरपाई मुख्यत्वे पीक कापणी प्रयोगाच्या आधारे निश्चित करण्याची पद्धत लागू करण्यात आली. त्यामुळे यंदाच्या तीव्र दुष्काळात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीच्या अग्रीम मदतीपासून वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, ट्रिगर रद्द करण्याच्या निर्णयाचा भविष्यात शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो, ही बाब डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी २०२५ मध्येच शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यांनी मुख्यमंत्री, कृषिमंत्री तसेच संबंधित यंत्रणांना निवेदन देऊन पीक विमा योजनेतील या बदलाचा फेरविचार करण्याची मागणी केली होती. मात्र, त्यावेळी या मागणीकडे गांभीर्याने लक्ष देण्यात आले नाही. आज राज्यातील अनेक भागांमध्ये दुष्काळाची तीव्रता वाढलेली असताना त्याच निर्णयावर दुष्काळ निवारण » पान २ वर